मराठी

# न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# महापौर व उपमहापौर पदाच्या निवडणुकीसाठी 6 फेब्रुवारीला विशेष सभा

## स्थायी समितीसह विविध विशेष समित्यांच्या सदस्यांची देखील केली जाणार नियुक्ती

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर पदाच्या निवडणुकीसाठी शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात विशेष सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेत स्थायी समितीसह विविध ५ विशेष समित्यांच्या सदस्यांची देखील नियुक्ती केली जाणार आहे, अशी माहिती आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी दिली.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर पद सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षित झाले आहे. या पदासह उपमहापौर पदाची निवड विशेष सभेत केली जाणार आहे. याबाबत पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या स्वाक्षरीने आदेश जारी करण्यात आले आहेत. या सभेचे पिठासीन अधिकारी म्हणून विभागीय आयुक्तांचे प्रतिनिधी म्हणून सहकार आयुक्त दिपक तावरे काम पाहणार आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार महापौर व उपमहापौर पदाच्या निवडीसाठी विशेष सभा बोलावली जाते. यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची विशेष सभा ६ फेब्रुवारी २०२६ रोजी होणार आहे. या सभेत महापौर व उपमहापौर यांच्यासह स्थायी समिती व विविध ५ विशेष समितीच्या सदस्यांची नियुक्ती केली जाणार आहे.



### स्थायी समितीवर १६ तर विशेष समितीवर ९ सदस्यांची केली जाणार

» महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीवर १६ सदस्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. तसेच विविध ५ विशेष समित्यांवर प्रत्येकी ९ सदस्यांची निवड देखील ६ फेब्रुवारी रोजी आयोजित विशेष सभेत करण्यात येणार आहे. विशेष समितीवर सदस्यांच्या नियुक्ती करताना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार पक्षांच्या किंवा गटाच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्यात येणार आहे. महिला व बालकल्याण समितीवर कमीतकमी ७५ टक्के सदस्य महिला सदस्यांमधून नियुक्त केले जाणार आहेत, अशी माहिती नगरसचिव मुकेश कोळप यांनी दिली.

### महापौर व उपमहापौर पदासाठी

» नामनिर्देशन पत्राचे छापील फॉर्म्स महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावर असणाऱ्या नगरसचिव कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळतील. नामनिर्देशन पत्र दाखल करण्याकरिता सोमवार, दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३ ते ५ ही वेळ निश्चित करण्यात आली आहे. नामनिर्देशन पत्र नगरसचिव कार्यालयात विहित वेळेत स्वीकारली जाणार आहेत, असे नगरसचिव मुकेश कोळप यांनी सांगितले.

# शिवसेनेच्या गटनेतेपदी विश्वजित बारणे यांची निवड

## शिवसेनेच्या नगरसेवकांची बैठक पार पडली, यात सर्व नगरसेवकांनी विश्वजित बारणे यांची गटनेतेपदी एकमताने निवड केली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेतील शिवसेना पक्षाच्या गटनेतेपदी विश्वजित श्रीरंग बारणे यांची निवड करण्यात आली. शिवसेनेच्या नगरसेवकांची आज (शनिवारी) बैठक पार पडली. यात सर्व नगरसेवकांनी विश्वजित बारणे यांची गटनेतेपदी एकमताने निवड केली.

महापालिका निवडणुकीत शिवसेनेचे सहा नगरसेवक निवडून आले आहेत. गटनेता निवडण्यासाठी जिल्हाप्रमुख राजेश खांडभोर यांची पक्षाने नियुक्ती केली होती. त्यानुसार खांडभोर यांच्या उपस्थितीत नवनिर्वाचित नगरसेवकांची बैठक झाली. शिवसेना नगरसेवकांनी विभागीय आयुक्त कार्यालयात गटाची नोंदणी केली आहे. शिवसेनेच्या गटनेतेपदी विश्वजित बारणे यांची एकमताने नियुक्ती करण्यात आली. शिवसेना उपनेते, मावळचे खासदार श्रीरंग बारणे, शिवसेना उपनेत्या, नगरसेविका सुलभा उबाळे, नगरसेवक निलेश बारणे, निलेश तरस, विश्वजित बारणे, नगरसेविका ऐश्वर्या राजेंद्र तरस, रेश्मा कातळे उपस्थित होते. खासदार श्रीरंग बारणे यांनी सर्व नगरसेवकांचे अभिनंदन केले. सर्वांचा सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या



पिंपरी-चिंचवड शहरात युवा संघटन बळकट केल्यानंतर विश्वजीत बारणे यांनी पश्चिम महाराष्ट्राची जबाबदारी हाती घेतली. पश्चिम महाराष्ट्रात संघटना बांधणी मजबूत केली आहे. संघटनेतील कामकाजाच्या अनुभवानंतर विश्वजीत यांनी पहिल्यांदाच निवडणुकीच्या राजकारणात उडी घेतली. प्रभाग २४ मधून त्यांनी शिवसेनेकडून निवडणूक लढविली. त्यांनी प्रतिस्पर्धी असलेल्या माजी उपमहापौर झामाबाई बारणे यांचे पुत्र माजी नगरसेवक राहिलेल्या भाजपच्या सिद्धेश्वर बारणे यांचा मोठ्या फरकाने पराभव केला. विश्वजीत बारणे यांनी आपल्या नगरसेवकपदाच्या पहिल्या इनिंगला सुरुवात केली आहे. त्यांच्या रूपाने अभ्यासू, तरुण, शहरातील युवा पिढीच्या प्रश्नांची जाण असणारे नेतृत्व महापालिका सभागृहात आले आहे. विश्वजीत बारणे यांच्यावर विश्वास टाकून सर्व नगरसेवकांनी गटनेतेपदी नियुक्ती केली आहे.

याबाबत विश्वजीत बारणे म्हणाले, शिवसेनेचे मुख्य नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, लोकसभेतील शिवसेनेचे गटनेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, खासदार श्रीरंग बारणे आणि सर्व नगरसेवकांनी माझ्यावर विश्वास ठेवला आहे. या सर्वांचा विश्वास पात्र ठरवेल. सभागृहात शिवसेनेचा आवाज दिसेल. शहराच्या विकासाच्या निर्णयाला शिवसेनेचा नेहमीच पाठिंबा राहील. मात्र, चुकीच्या कामाला तेवढ्याच आक्रमकपणे विरोध केला जाईल.

# पिंपरी-चिंचवड पोलिसांचे 'पीसी शील्ड' ॲप

## 1,585 सराईत गुन्हेगारांचे मॅपिंग पूर्ण, डिजिटल पोलिसिंगकडे पाऊल; गुन्हे नियंत्रण, गस्त आणि प्रतिसादाचा वेग वाढणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिस यांनी 'पीसी शील्ड' नावाचे अत्याधुनिक मोबाईल ॲप विकसित केले आहे. या ॲपच्या माध्यमातून पोलिसिंग अधिक गतिमान, पारदर्शक करण्यावर भर देण्यात आला आहे. यातील सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे शहरातील सराईत गुन्हेगारांच्या घरांचे मॅपिंग करण्याचे काम वेगाने सुरू असून, आतापर्यंत 1,585 गुन्हेगारांच्या घरांचे मॅपिंग पूर्ण करण्यात आले आहे.

पीसी शील्ड ॲपमध्ये पेट्रोलिंग, आरोपी तपासणी, दामिनी पथक, नाकाबंदी, व्हिजिबल पोलिसिंग यासह महत्त्वाचे सण-उत्सव, निवडणुका आणि विशेष बंदोबस्त याबाबतची अद्ययावत माहिती रिअल-टाइम स्वरूपात उपलब्ध राहणार आहे. यामुळे फिल्डवरील अधिकाऱ्यांना सूचनांची देवाणघेवाण जलद होऊन समन्वय वाढणार आहे.

गुन्हेगारांचे मॅपिंग आणि डेटाबेसमुळे संशयितांची छाननी अधिक अचूक होणार आहे. एखाद्या घटनेनंतर सर्वात जवळचे संशयित, त्यांचा इतिहास आणि लोकेशन त्वरित तपासता येणार असल्याने घटनास्थळी प्रतिसादाचा वेग वाढेल, तसेच तपास अधिक नेमका होईल.

पीसी शील्ड ॲपमुळे शहरातील गस्तीवर वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांचा थेट आणि सातत्यपूर्ण डिजिटल वॉच राहणार आहे. गस्तीवर असलेले मार्शल किंवा पोलिस कर्मचारी यांनी सराईत गुन्हेगारांच्या घरी किती वेळा, केव्हा आणि कोणत्या कालावधीत भेट दिली, याची सविस्तर नोंद ॲपमध्ये आपोआप अपडेट होणार आहे. ही माहिती वरिष्ठ अधिकारी वेळोवेळी तपासणार असून, गस्तीतील निष्काळजीपणा, औपचारिक भेटी किंवा दुर्लक्ष याला आळा बसणार आहे.

पीसी शील्ड ॲपमुळे पोलिस अधिकाऱ्यांना एका क्लिकवर आरोपीची इत्थंभूत माहिती उपलब्ध होणार आहे. यामध्ये आरोपीचा फोटो, त्याच्यावर दाखल असलेले गुन्हे, गुन्ह्यांचा प्रकार, राहत्या घराचा अचूक पत्ता व नकाशावरील स्थान अशी सविस्तर माहिती समाविष्ट आहे. त्यामुळे शहरात नव्याने रुजू होणाऱ्या अधिकाऱ्यांचे काम सुलभ होणार असून, स्थानिक माहिती नसतानाही ते तात्काळ कारवाईचे नियोजन करू शकणार आहेत.



### स्थायी समितीवर १६ तर विशेष समितीवर ९ सदस्यांची केली जाणार

» गुन्हेगारांच्या घरांचे मॅपिंग झाल्याने गुन्हे हॉटस्पॉट्स ओळखणे सोपे होणार आहे. एखाद्या परिसरात संशयास्पद हालचाली, पुनरावृत्ती होणारे गुन्हे किंवा तक्रारींचे प्रमाण वाढल्यास, त्या भागात लक्ष केंद्रित पेट्रोलिंग आणि तत्काळ नाकाबंदी राबवता येणार आहे. परिणामी, प्रतिबंधात्मक कारवाई अधिक परिणामकारक ठरण्याची अपेक्षा पोलिसांकडून व्यक्त केली जात आहे.

### डिजिटल पोलिसिंगकडे पाऊल

» पीसी शील्ड हा उपक्रम डिजिटल पोलिसिंगकडे टाकलेले यशस्वी पाऊल मानले जात आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने पोलिस यंत्रणा अधिक सक्षम होत असताना, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी ही प्रणाली महत्त्वाची ठरणार आहे. आगामी काळात यामध्ये आणखी सुविधा समाविष्ट करण्याचा पोलिसांचा मानस आहे.

> **पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम, प्रभावी आणि तंत्रज्ञानाधारित करण्याच्या दृष्टीने 'पीसी शील्ड' हे मोबाईल ॲप विकसित करण्यात आले आहे. या ॲपच्या माध्यमातून सराईत गुन्हेगारांच्या घरांचे मॅपिंग करण्यात येत असून, आतापर्यंत 1,585 गुन्हेगारांचे मॅपिंग पूर्ण झाले आहे. यामुळे पोलिस अधिकाऱ्यांना आरोपीची संपूर्ण माहिती, गुन्हेगारी पार्श्वभूमी, छायाचित्र व वास्तव्याचा तपशील एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे. विशेषतः शहरात नव्याने नियुक्त होणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी हे साधन उपयुक्त ठरणार आहे.**
>
> **- विनय कुमार चौबे, पोलिस आयुक्त, पिंपरी-चिंचवड**

# पुणे आणि पिंपरी-चिंचवड मेट्रोने 2025 मध्ये रचला विक्रम

## पीसीएमसी–स्वारगेट व वनाज–रामवाडी मार्गांना नागरिकांचा वाढता प्रतिसाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड या दोन शहरांतील अंतर मेट्रोसेवेमुळे आणखी कमी झाले आहे. पिंपरीहून सुमारे वीस मिनिटांत सुलभ आणि जलद प्रवास करत पुणे गाठता येते. दिवसेंदिवस मेट्रोच्या प्रवासी संख्येत लक्षणीय वाढ होत असून, सन 2025 या वर्षभरात 6 कोटी 71 लाख 40 हजार 907 प्रवाशांनी प्रवास केला. यात पीसीएमसी (पर्पल लाईन) ते स्वारगेट मार्गावर 3 कोटी 1 लाख 39 हजार 53 प्रवाशांनी, तर वनाज ते रामवाडी 3 कोटी 70 लाख 1 हजार 854 प्रवाशांनी प्रवास केला आहे. गत वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉपोरेशनच्या तिजोरीत 105 कोटी 42 लाख 7 हजार 554 एवढा महसूल जमा झाला आहे.



पुणे मेट्रोच्या पहिल्या टप्प्यात पिंपरी-चिंचवड महापालिका (पीसीएमसी) ते फुगेवाडी आणि वनाज ते गरवारे कॉलेज या 12.2 किलोमीटर दरम्यान 6 मार्च 2022 रोजी मेट्रोसेवा सुरू झाली; परंतु या दोन्ही मार्गावरील अंतर कमी असल्यामुळे, मेट्रोसेवेला प्रवाशांचा अल्प प्रतिसाद मिळत होता. दुसऱ्या टप्प्यात 1 ऑगस्ट 2023 रोजी फुगेवाडी ते सिव्हिल कोर्ट 6.99 किलोमीटर, गरवारे कॉलेज ते रुबी हॉलपर्यंत 4.75 किलोमीटर मेट्रोसेवा सुरू झाली. त्यानंतर तिसऱ्या टप्प्यात 6 मार्च 2024 रोजी रुबी हॉल ते रामवाडीपर्यंत 5.5 किलोमीटर मेट्रोसेवा सुरू झाली. तसेच वनाज ते रामवाडीपर्यंत 16.5 पाच किमीचा पहिला मेट्रो मार्ग पूर्ण क्षमतेने सुरू झाला.

सार्वजनिक वाहतूक सक्षम करण्यासाठी आणि जलद प्रवास होण्यासाठी केंद्र, राज्य व महापालिकेच्या निधीतून पिंपरी-चिंचवड आणि पुणे शहरासाठी मेट्रो सुरू करण्यात आली आहे. नियोजनशून्य रस्ते विकास, अपूर्ण कामे आणि बेजबाबदार प्रशासन यामुळे नागरिकांना वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत होते; मात्र मेट्रोसेवा सुरू झाल्यापासून पुणे तसेच पिंपरी-चिंचवड शहरवासीयांची काही प्रमाणात वाहतूक कोंडीतून सुटका झाली असून दिवसेंदिवस मेट्रोच्या प्रवासी संख्येत लक्षणीय वाढ होत आहे. सन 2025 वर्षभरात 6 कोटी 71 लाख 40 हजार 907 प्रवाशांनी प्रवास केला असून, यातून 105 कोटी 42 लाख 7 हजार 554 एवढे उत्पन्न मिळाले आहे. यात लाइन-वन म्हणजेच पीसीएमसी (पर्पल लाईन) ते स्वारगेट मार्गावर 3 कोटी 1 लाख 39 हजार 53 प्रवाशांनी प्रवास केला. याच कालावधीत 49 कोटी 39 लाख 73 हजार 392 येवढे उत्पन्न मिळाले, तर वनाज ते रामवाडी लाइन-टू 3 कोटी 70 लाख 1 हजार 854 प्रवाशांनी प्रवास करून यातून 56 कोटी 2 लाख 34 हजार 162 येवढे उत्पन्न मिळाले आहे.

> **मेट्रो प्रवाशांची गैरसुविधा होऊ नये, म्हणून ऑनलाइन आणि ऑफलाइन दोन्ही सुविधा देण्यात आलेल्या आहेत. तसेच उत्तम प्रकारे सुविधा मिळत असल्याने मेट्रोसेवेला सरत्या वर्षीच्या कालावधीत पुणे आणि पिंपरी-चिंचवडकरांचा उत्तम प्रतिसाद लाभला आहे.**
>
> **- चंद्रशेखर तामवेकर, जनसंपर्क अधिकारी मेट्रो.**

# पुण्याला फेब्रुवारीमध्ये मिळणार नवा महापौर

## महापालिकेकडून पहिल्या सभेच्या निश्चितीसाठी विभागीय आयुक्तांना पत्र! पुण्याला फेब्रुवारीत नवा महापौर मिळण्याची शक्यता; महापालिकेची तयारी सुरु

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेकडून महापौर, उपमहापौर निवड व पहिल्या सभेसाठीची तांत्रिक तयारी सुरू करण्यात आली आहे. त्यासाठी महापालिकेच्या नगरसचिव विभागाकडून विभागीय आयुक्तांना शुक्रवारी (ता. २३) पत्र पाठविण्यात आले आहे. त्यामुळे फेब्रुवारीच्या प्रारंभी महापौर, उपमहापौर निवड व नवनिर्वाचित नगरसेवकांची पहिली सभा होऊन पुण्याला नवीन महापौर मिळण्याची शक्यता आहे.

महापालिका निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर महापौर पदासाठीचे आरक्षण गुरुवारी (ता. २२) काढण्यात आले. महापौरपद सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी राखीव झाले आहे. त्यानुसार सर्वाधिक नगरसेवक निवडून आलेल्या भाजपकडून महापौरपदासाठी इच्छुक महिलांची नावे पुढे येऊ लागली आहेत. दरम्यान, महापौरांचे नाव निश्चित करण्याबाबत भाजपमध्ये चर्चा सुरू झाली आहे, तर दुसरीकडे नगर सचिव कार्यालयामार्फत महापौर, उपमहापौर निवड प्रक्रिया, नवनिर्वाचित सदस्यांची पहिली बैठक घेण्यासाठी विभागीय आयुक्तांना पत्र पाठविण्यात आले आहे.

विभागीय आयुक्त कार्यालयाकडून लवकरच महापालिकेच्या पहिल्या सभेची तारीख व पीठासीन अधिकाऱ्यांच्या नियुक्तीबाबतची माहिती कळविली जाण्याची शक्यता आहे. २६ जानेवारीनंतर इच्छुक सदस्यांकडून नगर सचिव कार्यालयास नामनिर्देशनपत्र सादर करण्याची प्रक्रिया सुरू होऊ शकते. त्यानंतर फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात नवनिर्वाचित सदस्यांची बैठक घेऊन महापौर, उपमहापौर यांची निवड प्रक्रिया राबविली जाऊ शकते, असे महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

महापालिका प्रशासनाला महापौर, उपमहापौर पदासाठीचे नामनिर्देशन पत्र घेणे, आलेल्या अर्जांची पीठासीन अधिकाऱ्यांकडून अर्जाची वैध, अवैधता तपासणे, त्यानंतर पहिल्या सभेची तयारी, त्यासाठी कार्यक्रम पत्रिका तयार करून नियोजन करणे, नवनिर्वाचित सदस्यांना पत्र पाठविणे, त्यांच्या कुटुंबीयांना पासेस देणे अशा कामांसाठी किमान १५ दिवसांची आवश्यकता भासते. त्यामुळे कमी कालावधीत प्रक्रिया राबविताना प्रशासनास तारेवरची कसरत करावी लागणार आहे. सर्व महापालिकांचे सभागृह एकाच दिवशी अस्तित्वात आले, तर महापालिकेच्या पुढील पंचवार्षिक निवडणुकीची प्रक्रिया अधिक सोपी होईल, या उद्देशाने नगर विकास विभागाने मुंबई वगळता राज्यातील सर्व महापालिकांचे महापौर, उपमहापौर निवड, पहिल्या सभेसाठी एकत्रित कार्यक्रम जाहीर केला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे महापालिकांच्या कारभारामध्ये सुसूत्रता येण्यास मदत होणार आहे.



### सुसूत्रतेसाठी राज्य सरकारचा प्रयत्न

» **आतापर्यंत प्रत्येक महापालिकेची निवडणूक वेगवेगळ्या वर्षी होत असे. मात्र यंदा राज्यात पहिल्यांदाच २९ महापालिकांच्या निवडणुका जाहीर होऊन निकालही एकाच दिवशी लागले. सर्व महापालिकांचे सभागृह एकाच दिवशी अस्तित्वात आले, तर महापालिकेच्या पुढील पंचवार्षिक निवडणुकीची प्रक्रिया अधिक सोपी होईल, या उद्देशाने नगर विकास विभागाने मुंबई वगळता राज्यातील सर्व महापालिकांचे महापौर, उपमहापौर निवड, पहिल्या सभेसाठी एकत्रित कार्यक्रम जाहीर केला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे महापालिकांच्या कारभारामध्ये सुसूत्रता येण्यास मदत होणार आहे.**

### प्रशासनाची तारेवरची कसरत

» **महापालिका प्रशासनाला महापौर, उपमहापौर पदासाठीचे नामनिर्देशन पत्र घेणे, आलेल्या अर्जांची पीठासीन अधिकाऱ्यांकडून अर्जाची वैध, अवैधता तपासणे, त्यानंतर पहिल्या सभेची तयारी, त्यासाठी कार्यक्रम पत्रिका तयार करून नियोजन करणे, नवनिर्वाचित सदस्यांना पत्र पाठविणे, त्यांच्या कुटुंबीयांना पासेस देणे अशा कामांसाठी किमान १५ दिवसांची आवश्यकता भासते. त्यामुळे कमी कालावधीत प्रक्रिया राबविताना प्रशासनास तारेवरची कसरत करावी लागणार आहे.**

# डबल डेकर पूल आणि मेट्रो प्रकल्पांना गती – विद्यापीठ चौकातील प्रकल्पांची पाहणी

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौकातील डबल डेकर उड्डाणपूल आणि माण–हिंजवडी मेट्रो प्रकल्पांच्या कामांना गती मिळाली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौकातील प्रस्तावित डबल डेकर उड्डाणपूल आणि माण-हिंजवडी मेट्रो मार्गिकेच्या कामांना गती मिळाली आहे. दुमजली उड्डाणपूल येत्या काही दिवसांमध्ये वाहतुकीसाठी खुला होणार असून कामे तातडीने पूर्ण करण्याची सूचना पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) संबंधित कंपनीला केली आहे. त्यामुळे वाहनचालकांची वाहतूक कोंडीतून सुटका होण्याची शक्यता आहे.

विद्यापीठ चौकातील उड्डाणपूल आणि मेट्रो मार्गिकेच्या कामांची पाहणी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी केली. अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंगला यांनी गुरुवारी केली. या पाहणीवेळी पीएमआरडीएच्या मुख्य अभियंता रिनाज पठाण, पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेड (पीआयटीसीएमआरएल)चे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल सैनी, पुणे महानगरपालिकेचे अधिकारी, संबंधित कंत्राटदार कंपन्यांचे प्रतिनिधी, तसेच पीएमआरडीएचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

पुणेकरांची वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेता, विद्यापीठ चौकातील डबल डेकर पूल शक्य तितक्या लवकर वाहतुकीसाठी खुला करण्याचे करण्याचे नियोजन असल्याचे डॉ. म्हसे यांनी यावेळी स्पष्ट केले. डबल डेकर पुलाच्या बाणेर रॅम्पचे काम अतिरिक्त मनुष्यबळ आणि संसाधनांचा वापर करून वेगाने पूर्ण करण्याची सूचनाही त्यांनी टाटा प्रोजेक्ट्स लिमिटेडच्या अधिकाऱ्यांना केली. तसेच, पाषाण बाजूकडील रॅम्पच्या कामात अडथळा ठरणाऱ्या पाण्याच्या गळतीची समस्या युद्धपातळीवर सोडवण्याच्या सूचना पुणे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना करण्यात आली.




### वाहतूक अधिक सुलभ व गतिमान होईल

» **दरम्यान, माण–हिंजवडी मेट्रो (लाईन-३) प्रकल्पाचाही सविस्तर आढावा घेण्यात आला. मेट्रो स्थानकांशी संबंधित तांत्रिक अडचणींवर चर्चा करून त्यावर तातडीच्या उपाययोजना सुचवण्यात आल्या. विशेषतः शिवाजीनगर स्थानक, मोदीबाग आणि विद्यापीठ चौक येथील पादचारी पुलांच्या (फूट ओव्हर ब्रिज) कामाची सद्य:स्थिती तपासण्यात आली. मेट्रो मार्गिकेवरील कामाचा दर्जा राखून प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण करण्यावर प्रशासनाने भर दिला आहे. हे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पुणे शहरातील वाहतूक अधिक सुलभ व गतिमान होईल, असा विश्वास डॉ. म्हसे यांनी व्यक्त केला.**

# ‘बालभारती’ गीताला अवधूत गुप्ते, वैशाली सामंत यांचा स्वरसाज...

## केंद्र सरकारच्या कोठारी आयोगाने 1964मध्ये राज्यांनी पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीसाठी स्वायत्त संस्थेची स्थापना करण्याची शिफारस केली होती.

**पुणे | प्रतिनिधी**

पाठ्यपुस्तकांच्या माध्यमातून अनेक पिढ्या घडवणाऱ्या, राज्यातील दोन कोटींहून अधिक विद्यार्थ्यांना शिक्षणाशी जोडणाऱ्या महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाचे (बालभारती) हीरक महोत्सवी वर्ष सुरू होत आहे. त्यानिमित्त बालभारती गीताची निर्मिती करण्यात आली असून, येत्या वर्षभरात बालसाहित्याच्या पुस्तकांचे प्रकाशन, पाठ्यपुस्तकांवरील परिषद असे विविध उपक्रम आयोजित केले जाणार आहेत.

केंद्र सरकारच्या कोठारी आयोगाने १९६४ मध्ये राज्यांनी पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीसाठी स्वायत्त संस्थेची स्थापना करण्याची शिफारस केली होती. त्यानुसार तत्कालीन राज्य सरकारने २७ जानेवारी १९६७ रोजी महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती आणि अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) स्थापन केले. त्यानुसार पाठ्यपुस्तकांसाठी आशयनिर्मिती, पाठ्यपुस्तकांची छपाई, वितरणाचे काम बालभारतीकडून केले जाते. राज्यातील गेल्या सहा दशकांत बालभारतीने राज्य मंडळाशी संलग्न शाळांतील विद्यार्थ्यांना भाषा, गणित, विज्ञान, इतिहास अशा विविध विषयांची पाठ्यपुस्तके सातत्याने उपलब्ध करून दिली आहेत. तसेच ‘किशोर’ या मासिकाद्वारे विद्यार्थ्यांना वाचनाची गोडीही लावली गेली. त्यामुळे बालभारतीशी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक आणि भावनिक नातेही जोडले गेले आहे.




### शिक्षणमंत्र्यांच्या उपस्थितीत मंगळवारी कार्यक्रम, प्रदर्शनाचे आयोजन

» बालभारतीच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त मंगळवारी (२७ जानेवारी) शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे, राज्यमंत्री पंकज भोयर यांच्या उपस्थितीत बालगंधर्व रंगमंदिर येथे सायंकाळी पाच वाजता कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंग देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी, राज्य परीक्षा परिषदेचे अध्यक्ष नंदकुमार बेडसे आदी उपस्थित राहणार आहेत. तसेच २५ ते २७ जानेवारी या कालावधीत बालभारतीच्या पाठ्यपुस्तकांपैकी निवडक ६० पाठ्यपुस्तकांच्या मुखपृष्ठांचे प्रदर्शन बालगंधर्व कलादालन येथे भरणार आहे.

बालभारतीच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त वर्षभरातील कार्यक्रमांच्या नियोजनाबाबतची माहिती बालभारतीच्या संचालक अनुराधा ओक यांनी दिली. ‘हीरक महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून तयार करण्यात आलेल्या ‘बालभारती’च्या गीताचे लोकार्पण केले जाणार आहे. गीतकार प्रा. दासू वैद्य यांनी लिहिलेले हे गीत अवधूत गुप्ते यांनी संगीतबद्ध केले आहे, तर वैशाली सामंत यांनी ते गायले आहे. तसेच, येत्या वर्षभरात बालसाहित्याची ६० पुस्तके प्रकाशित केली जाणार आहेत. पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीबाबत राष्ट्रीय स्तरावरील परिषदेचे आयोजन, पाठ्यपुस्तके आणि अवांतर वाचनासाठीची पुस्तके ऑनलाइन खरेदीसाठी उपलब्ध करणे, नव्या अभ्यासक्रमानुसार ‘ई बालभारती’द्वारे डिजिटल माध्यमात आशयनिर्मिती करण्याचे नियोजन आहे,’ असे ओक यांनी सांगितले.

### बालभारतीची वैशिष्ट्ये

» मराठीसह आठ माध्यमांतील पाठ्यपुस्तकांची निर्मिती, छपाई, वितरण

» सात कोटींहून अधिक पाठ्यपुस्तके, २.५० कोटींहून अधिक कृतिपत्रिका ३५ जिल्हा परिषदा, २२ महापालिका, नगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांना उपलब्ध

» शिक्षकांसाठी हस्तपुस्तिकांची निर्मिती

### ‘बालभारती’च्या गीताचे लोकार्पण केले जाणार

» बालभारतीच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त वर्षभरातील कार्यक्रमांच्या नियोजनाबाबतची माहिती बालभारतीच्या संचालक अनुराधा ओक यांनी दिली. ‘हीरक महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून तयार करण्यात आलेल्या ‘बालभारती’च्या गीताचे लोकार्पण केले जाणार आहे. गीतकार प्रा. दासू वैद्य यांनी लिहिलेले हे गीत अवधूत गुप्ते यांनी संगीतबद्ध केले आहे, तर वैशाली सामंत यांनी ते गायले आहे.

# महापालिकेची अभियंता भरती परीक्षा पुन्हा पुढे; परीक्षा केंद्रांवरून उमेदवारांचा आक्षेप

## महापालिकेतील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदांच्या भरतीसाठी घेण्यात येणारी परीक्षा पुन्हा एकदा पुढे ढकलण्यात आली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेतील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदांच्या भरतीसाठी घेण्यात येणारी परीक्षा पुन्हा एकदा पुढे ढकलण्यात आली आहे. लोकसभा, विधानसभा तसेच नुकत्याच पार पडलेल्या महापालिका निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे यापूर्वी रद्द करण्यात आलेली ही परीक्षा येत्या रविवारी (दि. २५) होणार होती. मात्र, परीक्षा केंद्रांच्या नियोजनाबाबत उमेदवारांकडून तीव्र आक्षेप घेण्यात आल्याने आणि त्यातून निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने ही परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

महापालिकेतील १६९ रिक्त जागांसाठी ही कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदांची भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या परीक्षेसाठी सुमारे ४२ हजारांहून अधिक उमेदवारांनी प्रत्येकी एक हजार रुपये शुल्क भरून अर्ज केले आहेत. परीक्षा जवळ आल्यावर हॉल तिकीट उपलब्ध झाल्यानंतर अनेक उमेदवारांना त्यांच्या राहत्या ठिकाणापासून ४०० ते ५०० किलोमीटर अंतरावरील खासगी परीक्षा केंद्रे देण्यात आल्याचे उघड झाले. त्यामुळे उमेदवारांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला.

सांगलीतील उमेदवाराला लातूर, लातूरच्या उमेदवाराला कोल्हापूर, नाशिकच्या उमेदवाराला जळगाव, तर कोल्हापूरच्या उमेदवाराला अमरावती येथे परीक्षा केंद्र देण्यात आल्याचे समोर आले. या निर्णयामुळे वेळ, खर्च आणि सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्याचे सांगत उमेदवारांनी गुरुवारी रात्री महापालिकेच्या मुख्य इमारतीबाहेर आंदोलन केले. अचानक मिळालेल्या दूरच्या केंद्रांमुळे परीक्षेला उपस्थित राहणे कठीण होणार असल्याचा आरोप उमेदवारांनी केला.

या आंदोलनानंतर महापालिका प्रशासनाकडून तातडीने हालचाली करण्यात आल्या. अखेर शुक्रवारी ही परीक्षा तांत्रिक तसेच प्रशासकीय कारणास्तव पुढे ढकलण्यात येत असल्याची घोषणा करण्यात आली. महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांनी परीक्षा पुढे ढकलण्यात आल्याची माहिती दिली असून, सध्या नव्या तारखेचा निर्णय घेण्यात येत असल्याचे स्पष्ट केले आहे.



### उमेदवारांमध्ये नाराजीचे वातावरण

» महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाकडूनही परीक्षेची पुढील तारीख, वेळ आणि केंद्रांची माहिती येत्या काही दिवसांत जाहीर केली जाईल, असे सांगण्यात आले आहे. दरम्यान, वारंवार परीक्षा पुढे ढकलली जात असल्याने उमेदवारांमध्ये नाराजीचे वातावरण असून, प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. रिक्त अभियंता पदांमुळे महापालिकेच्या कामकाजावर परिणाम होत असताना, भरती प्रक्रिया लवकर पूर्ण करण्याची मागणी उमेदवारांकडून केली जात आहे.